**L. C. BILL No. IV OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT, 1959.

## सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४.

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३.

एचबी–२८१३-१

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ याच्या कलम १४, पोट-कलम (१) मधील खंड (ञ-३) मध्ये पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु एखाद्या पंचायत सदस्याने त्याच्या निवडून आलेल्या कालावधीत एखाद्या शासकीय जमिनीवर किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण केलेले असल्यास व त्यासंदर्भात योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे तक्रार दाखल होऊन प्रकरणाची सुनावणी प्रलंबित असतानाच्या कालावधीत संबंधित पंचायत सदस्याने अतिक्रमण निष्कासित केले किंवा नियमित करून घेतले तर सदर सदस्याचा पदावधी संपून तो पंचायतीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडणूक लढविण्यास निरर्ह ठरणार नाही."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ (१९५९ चा अधिनियम क्र. ३) मधील कलम १४ मध्ये पंचायतीच्या सदस्यांच्या निरर्हतेची तरतूद आहे. उक्त कलमाच्या पोट-कलम (१) च्या खंड (ज-३) मध्ये ज्या व्यक्तीने शासकीय जमिनीवर किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण केले आहे अशी व्यक्ती निरर्ह ठरेल अशी तरतूद आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, शासकीय जमिनीवर किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण केलेल्या व्यक्तींनी संबंधित बांधकाम नियमित केले किंवा ते निष्कासित केले तरीही त्यांच्यावरील निरर्हतेची कारवाई त्यांच्या पंचायत सदस्याच्या पदावधीनंतरही चालू राहते व ती व्यक्ती पुन्हा निर्वाचित झाल्यास त्याच्यावर पूर्वी ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने कारवाई होते, ही बाब राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकप्रतिनिधींसाठी अवमानकारक व अन्यायकारक आहे. त्यामुळे शासकीय जमिनीवरील किंवा सार्वजनिक मालमत्तेवरील अतिक्रमण त्यांनी नियमित करून घेतले किंवा ते निष्कासित करण्यात आले तर ती व्यक्ती पुन्हा निवडणूक लढवून निवडून येण्यास अपात्र ठरू नये अशी तरतूद उक्त अधिनियमात करणे आवश्यक आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक १७ जानेवारी, २०२३.

**अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.

(शा.म.मु.) एचबी २८१३-२ (१५०—३–२०२३)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४.]**

**[महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.